महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे.

जा.क्र. ९०३ दि. 17 MAR 2025

## रद्दी विक्रीची सुचना

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे, ४१२/ई, ३रा मजला, म. रा. तं. शि. मंडळाची नवीन इमारत, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे येथील निकाली काढण्यात आलेले जुने अभिलेख ( कागद तसेच नस्तिचे पुठ्ठे ) रद्दी (अंदाजे १००० किग्रॅ) विक्री करावयाची आहे. सदर विक्रीकरीता ईच्छुक संस्थांनी **दिनांक १८/०३/२०२५ ते दिनांक २५/०३/२०२५ सायं ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यातुन** दरपत्रके या कार्यालयात सादर करावे. जास्तीत जास्त दर देणा-या संस्थेचे दर मान्य करण्यात येतील. वर नमूद रद्दी उपरोक्त पत्त्यावर उपलब्ध असून दिनांक १८/०३/२०२५ ते दिनांक २५/०३/२०२५ दरम्यान सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत पाहता येतील.

दि. २७/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. समीती सभागृह, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे याठिकाणी प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्यात येतील.

ज्या संस्थांना खालील नमूद अटी व शर्ती मान्य असतील अशा संस्थांनीच आपली दरपत्रके सादर करावीत व लिफाफ्यावर **जुनी रद्दी विक्री करिता दरपत्रक** असे नमुद करावे.

### अटी व शर्ती

१. सदर जुने अभिलेख रद्दी पेपर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे, ४१२/ई, ३रा मजला, म. रा. तं. शि. मंडळाची नवीन इमारत, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे येथे असून आहे त्या स्थितीतून उचलण्यास तयार आहे.

२. ठेकेदाराने यापूर्वी मागील ६ महिन्यात शासकीय कार्यालयातील जुनी रद्दी खरेदी केल्याचे आदेशाची प्रत जोडावी.

३. दरपत्रके सादर करणारी संस्था सदर रद्दीचा लगदा करेल किवा तसे करणा-या संस्थेस लगदा करण्यास देईल अशा आशयाचे हमीपत्र दरपत्रकासोबत जोडेल.

४. रद्दी पेपरचे जास्तीत जास्त दर देणा-या संस्थेचे दरपत्रक मान्य करण्यात येईल व त्या संस्थेस तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे रु. १०,००० इतकी आगाऊ रक्कम २ दिवसांत भरावी लागेल. सदर रक्कम रद्दी विक्री रकमेमध्ये समायोजीत करण्यात येईल.

५. जुने रद्दी विक्री कामाचे आदेश दिल्यापासून कार्यालयीन ७ दिवसांच्या आत रद्दीचे वजन करून रद्दी आहे त्या स्थितीतून उचलावी लागेल.

६. रद्दी पेपर फाडून तुकडे करून स्वतंत्र गोणीत भरून न्यावे लागेल व कोणत्याही परिस्थितीत अखंड कागद कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाही.

७. रद्दीचे वजन तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या समक्ष करणे अनिवार्य आहे. तसेच त्या वजन काट्याचे निरीक्षण या कार्यालयाकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कोणतेही दर मंजूर करणे वा रद्द करणे तसेच रद्दी विक्रीची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे या कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील त्याबद्दल कोणतीही कारणमिमासा केली जाणार नाही.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत: १. नोटिस बोर्ड
२. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.